On The Occasion of
The International Women's Day
"Social Scenario of
Women in India"

Date: 8-9 March 2017

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

## ८ मार्च - जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित

# "लिंगभाव सजगता महोत्सव"

८ मार्च मानवी इतिहासातील प्रेरणादायी दिवस. युगायुगांची गुलामी, विषमता, दुय्यमत्वाच्या चक्रव्युहास भेदणारे स्त्रीवादी पाऊल. या पाऊलवाटेने अनेक स्त्रियांच्या मुक्तीचा, प्रगतीचा मार्ग सुखकर केला. पण अजुनही हा स्त्रीत्वाचा हुंकार जाणीव, आवाज प्रचलित विषमता, दुय्यमत्व, हिंसाचाराला नामशेष करु शकलेले नाही.

एकविसाव्या शतकामध्ये माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीमध्ये स्त्रीमुक्ती आणि स्त्रीसक्षमीकरणाच्या भरीव परिवर्तनाचे चित्र नक्कीच आशादायी असले तरी परिवर्तनवादी समतावादी विचारलढ्याचे लाभधारक असणाऱ्या आपणा सर्वांचे हे कर्तव्य ठरते की या विचारलढ्याला पुढे नेणारी कडी बनावे.

८ मार्च युनेस्कोने जाहिर केलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त परिवर्तनवादी समतादर्शी विचारलढ्यांचे स्मरण करावे व वर्तमानातील विषमता - आव्हानांना अव्हेरुन त्याविरुद्ध उभे राहण्याचा संकल्प सर्व तरुण विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, प्राध्यापक व आपणा सर्वांनी करावा या जाणीवेने ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे "लिंगभाव सजगता" महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. सदरील महोत्सवास दि. ८ मार्च रोजी प्रारंभ होत असून या महिन्यात दर शुक्रवारी अमोल पालेकर, गणेश देवी व संध्या गोखले यांच्या संकल्पनेतील देश-विदेशी भाषांमधील जगविख्यात दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले स्त्रीप्रधान चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. तरी सदरील महोत्सवाचा मोठ्या संख्येने भाग बनून परिवर्तनवादी स्त्री-पुरुष एकजुटीच्या विचारांचा एल्गार बुलंद करु हे आवाहन.

---

## दि. ८ मार्च २०१७

- स. १० वा. :- "स्त्री-पुरुष समता एकजुट" रॅली
  मार्ग : प्रशासकीय इमारत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा - महात्मा फुले पुतळा
- स. ११.३० वा. :- लिंगभाव सजगता विषयावर विशेष व्याख्यान व मुक्तसंवाद
  व्याख्याते - मा. शर्मिष्ठा भोसले,
  स्थळ : महात्मा फुले सभागृह, प्रशासकीय इमारत
- दु. ०१ वा. स्त्रीप्रधान चित्रपट, स्थळः महात्मा फुले सभागृह
- स्त्रीवादी पोस्टर प्रदर्शन
  स्थळ : ता.शिं.स्त्री.अभ्यास केंद्र, सामाजिकशास्त्रे इमारत, वेळ : स. १० ते सायं. ६ वाजेपर्यंत

**दि. ९ मार्च ते ११ मार्च २०१७:** देश-विदेशातील प्रसिद्ध स्त्रीप्रधान चित्रपट प्रदर्शन
स्थळ : अर्थशास्त्र सभागृह क्रं. २, सामाजिकशास्त्रे इमारत, वेळ : दु. १ ते ४

विनितः प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे, संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

---

७.०३.२०१७

## जागतिक महिला दिनानिमित्त विद्यापीठात स्त्री-पुरुष समता एकजुट रॅली व विशेष व्याख्यानाचे आयोजन

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, विद्यार्थी कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री-पुरुष समता एकजुट रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रॅली मुख्य प्रशासकीय इमारतीपासून सुरु होऊन विद्यापीठातील वायकॉर्नर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाला अभिवादन करुन प्रशासकीय इमारतीपुढील महात्मा फुले यांच्या पुतळयाजवळ विसर्जित होईल.

सदरील रॅलीनंतर स ११.३० वा. महात्मा फुले सभागृहात मा. शर्मिष्ठा भोसले यांचे लिंगभाव सजगता या विषयावर मा. कुलगुरु प्रोफेसर बी.ए. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष व्याख्यान व मुक्तसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. नलिनी चोपडे करणार असून कुलसचिव डॉ. प्रदिप जबदे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. सदरील व्याख्यानानंतर स्त्रीप्रधान चित्रपट दाखविण्यात येणार असून ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात स्त्रीवादी पोस्टर प्रदर्शनही आयोजित करण्यात आले आहे.

तसेच दि. ९ते ११ मार्च या कालावधीत ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात दु.१ ते ४ यावेळेत अमोल पालेकर, संध्या गोखले, गणेश देवी यांच्या संकल्पनेतील देश-विदेशी भाषांमधील जगविख्यात दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले स्त्रीप्रधान चित्रपट दाखविण्यात येणार आहे.

तरी सदरील स्त्री-पुरुष समत रॅली, विशेष व्याख्यान व इतर कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे व विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुहास मोराळे यांनी केले आहे.

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

8 march 2017



